नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत प्रशासकीय खर्चासाठी रु.४.३९ कोटी इतका निधी वितरीत करण्याबाबत (सन २०२५-२६).

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक किसनी-२०२५/प्र.क्र.१३६/११-अे,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १६ मार्च, २०२६

वाचा :-

१) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र.किसनि- २०२३/ प्र.क्र.४२/११-अे, दि.१५.६.२०२३,
२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. किसनी-२०२५/प्र.क्र.१३६/११-अे,दि.१८.०९.२०२५,
३) संचालक(वि.प्र.), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.कृ.गणना/न.शे.म.नि.यो/ प्रशासकीय निधी २०२५-२६ नस्ती/रजि.४९/२०२६, दि.१२.०१.२०२६.

प्रस्तावना :-

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना राबविण्यास संदर्भ क्र.(१) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच, सदर योजनेअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये, नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या लेखाशिर्षांतर्गत मंजूर तरतूदीमधून प्रस्तुत योजनेंतर्गत प्रशासकीय खर्चासाठी मंजूर मनुष्यबळाच्या मानधनासाठी - (माहे एप्रिल २०२५ ते नोव्हेंबर, २०२५ या ८ महिन्यांच्या कालावधीकरिता ) रु.११.३५ कोटी इतका निधी व कार्यालयीन खर्चासाठी - रु.४.०० कोटी (६ महिन्यांकरिता) अशाप्रकारे एकूण रु.१५.३५ कोटी वितरीत करण्यास संदर्भ क्र. (२) येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

आता संचालक(विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये केलेल्या विनंतीस अनुसरून, नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील उर्वरीत माहे डिसेंबर, २०२५ ते मार्च, २०२६ या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे कार्यरत मनुष्यबळाचे मानधन अदा करण्याकरिता रु.४,३९,९३,७२६/- इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील उर्वरीत माहे डिसेंबर, २०२५ ते मार्च, २०२६ या कालावधीकरिता बाह्ययंत्रणेद्वारे कार्यरत मनुष्यबळाचे मानधन अदा करण्याकरिता रु.४,३९,९३,७२६/- (रुपये चार कोटी एकोणचाळीस लाख त्र्याण्णव हजार सातशे सव्वीस फक्त) इतका निधी वितरीत करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२.    प्रस्तुत खर्च पुढील लेखाशिर्षाखाली सन २०२५-२६ करिता मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा -

**मागणी क्र. डी -३**
**२४०१ - पीक संवर्धन**
**००**
**११५, लहान/सीमान्त शेतक-यांची आणि शेतमजुरांची योजना**
**(००)**
**(००)(०६) - नमो शेतकरी महासन्मान निधी योजना**
**(१००% राज्य योजना) (कार्यक्रम)**
**(२४०१ B४५५), ३३-अर्थसहाय्य**

३.    सदर शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी संदर्भ क्र. (१) च्या शासन निर्णयात नमूद व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय /परिपत्रकांमधील तरतूदीनुसार खर्च करण्याची जबाबदारी आयुक्त (कृषि) यांची राहील.

४.    उपरोक्तप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीच्या विनियोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र, आयुक्त (कृषि) शासनास सादर करतील.

५.    प्रस्तुत शासन निर्णय, वित्त विभागाने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक १०८/२०२६/व्यय-१, दि.२८.०२.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६.    प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०२६०३१६१९१२४७८५०१ असा आहे.  हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATIBHA MADHAV PATIL

Digitally signed by PRATIBHA MADHAV PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=b693d975fffc642fe6b87c2ce9e1297fd1e8bda9b459f85f75f159984ba680fd, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=DA026E85AE8CBB4E3C2ACDBECBBF2F6D6CB0AE6ED5C1E54483490119EE0456AD, cn=PRATIBHA MADHAV PATIL
Date: 2026.03.16 19:13:46 +05'30'

**( प्रतिभा पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव

५. मा. मंत्री, (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
६. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
७. मा. राज्यमंत्री, (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
८. सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
९. सर्व मा.विधानसभा / मा. विधानपरिषद सदस्य
१०.मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई ३२
११.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१२.अपर मुख्य सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१३.सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१५. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१८. सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
१९. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२३. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
२४. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरीक्षा ), मुंबई.
२५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई
२६. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखापरीक्षा ), नागपूर
२७. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता),नागपूर
२८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३०. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
३१. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३२. सर्व तहसीलदार
३३. सर्व तालुका कृषि अधिकारी
३४. निवडनस्ती, कार्यासन ११-अे.